


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ     Mob- 9822720784     Email- jansanchlan@gmail.com     RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे     अंक : २८२ वा     शनिवार दि २४ जानेवारी २०२६     पृष्ठ ८     किंमत ३ रुपये

# शिंदेंनी ताणून धरताच भाजपचं ठरलं गणित पहिल्यांदाच बदलणार आकडे बदलताच गेम फिरला...

**वृत्तसंस्था/मुंबई**

मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागून आठवडा होत आला आहे. महापालिका निवडणुकीत महायुतीला काठावरचं बहुमत मिळालं आहे. सत्ता स्थापनेसाठी ११४ जागांचा आकडा गाठण्याची गरज आहे. भाजप आणि शिंदेसेनेचा एकत्रित आकडा ११८ इतका आहे. शिंदेसेनेच्या मदतीशिवाय भाजप सत्तेचा सोपान गाठू शकत नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे शिंदेसेनेनं महापौरपदाची मागणी केली. महापौरपद अडीच वर्षांसाठी मिळावं, असा आग्रह शिंदेसेनेनं धरला. पण यासंदर्भात कोणतीही तडजोड न करण्याची भूमिका भाजपनं घेतली आहे. १९९७ ते २०२२ अशी २५ वर्षे मुंबई महापालिकेत शिवसेनेचा महापौर होता. एकसंध शिवसेना आणि भाजपची युती असताना सेनेकडे महापौरपद आणि भाजपकडे उपमहापौरपद अशी सत्तापदांची वाटणी व्हायची. या कालावधीत शिवसेनेच्या जागा भाजपच्या जवळपास तिप्पट असायच्या. सेनेकडे जास्त संख्याबळ असल्यानं त्यांनी महापौरपद कायम आपल्याकडे ठेवलं. पण आता नेमकी उलट परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे महापौर आणि उपमहापौरपदाचं गणित पहिल्यांदाच बदलणार आहे. यंदा भाजपनं शिवसेनेपेक्षा तिप्पट जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे शिवसेनेला पहिल्यांदाच उपमहापौरपदावर समाधान मानावं लागेल. महापौरपद आपल्याकडे ठेवण्यावर भाजप अतिशय ठाम आहे. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला आजपासून सुरुवात झाली आहे. त्यामुळे या कालावधीत महापौरपद आपल्याकडे असावं, अशी शिवसेनेची इच्छा होती. त्यांनी यासंदर्भात मागणी करुन पाहिली. पण भाजपनं ही मागणी अमान्य केल्याचं समजतं. शिंदेसेनेकडून उपमहापौरपदासाठी समृद्धी काते, शैला लांडे, अश्विनी माटेकर यांची नावं चर्चेत आहेत. तृष्णा विश्वासराव, संध्या दोषी, अंजली नाईक यांच्या नावांचा विचार स्थायी समिती, शिक्षण समितीसाठी केला जाण्याची शक्यता आहे. शिवसेना, भाजप यांच्या युतीत महापौरपद कायम सेनेकडे राहिलं. पण आता पहिल्यांदाच भाजपकडे महापौरपद जाईल आणि सेनेला उपमहापौर पदावर समाधान मानावं लागेल. भाजपनं यंदा मुंबईत १३७ जागा लढवल्या. यातील ८९ जागांवर त्यांनी विजय मिळवला. तर शिंदेसेनेनं ९० जागा लढवत २९ जागा जिंकल्या. शिंदेसेनेला अपेक्षित यश न मिळाल्यानं महायुतीला काठावरचं बहुमत मिळालं. शिंदेसेना विरुद्ध ठाकरेसेना या थेट लढतीत शिंदेसेना मागे पडली. ४४ प्रभागांमध्ये शिंदेसेना विरुद्ध ठाकरेसेना असा सामना झाला. यातील ३४ जागा ठाकरेंनी जिंकल्या. तर शिंदेंना केवळ १० जागांवर यश मिळालं.



# गव्हाचे दाणे आले, पण ज्वारी नाही रेशनचे प्रकरण चिठ्ठीत!

**जनसंचलन/मेहकर**

शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत () रेशन वितरण तालुक्यात गोंधळाची साखळी निर्माण झाली आहे. गहू व तांदूळ उपलब्ध असूनही ज्वारीच्या साठ्यामुळे रेशन दुकाने बंद पडली आहेत. परिणामी, गरीब व अत्यल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना धान्य मिळवण्यासाठी रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. तालुक्यातील रेशन दुकानदारांनी स्पष्ट केले की, तांत्रिक नियमांनुसार गहू, तांदूळ व ज्वारी एकत्र वाटप करणे आवश्यक आहे. ज्वारीचा साठा वेळेत न पोहोचल्यामुळे संपूर्ण रेशन वितरण ठप्प आहे. स्थानिकांनी नाराजी व्यक्त करत म्हणाले, गहू-तांदूळ आले तरी ज्वारीशिवाय धान्य मिळत नाही. तहसील प्रशासन आणि पुरवठा विभागाकडून अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती मिळालेली नाही. शासन पौष्टिक तृणधान्यांचा प्रचार करत असताना प्रत्यक्ष वितरणात झालेला विलंब नागरिकांसाठी मोठा धक्का ठरतो आहे. ग्रामीण जनतेकडून तातडीने ज्वारीचा



पुरवठा सुनिश्चित करण्यासह गहू व तांदूळचा तातडीने वाटप करण्याची मागणी जोर धरत आहे. प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे लाभार्थ्यांची जीवनशैली धोक्यात आलेली असून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# स्प्रिंकलरच्या तोट्या चोरणाऱ्या मोहना खुर्द येथील दोघांना अटक

**जनसंचलन/बुलढाणा**

डोणगाव शेतीसाठी अत्यावश्यक असलेल्या स्प्रिंकलरच्या तोट्या चोरी करणाऱ्या टोळीचा डोणगाव पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी मेहकर तालुक्यातील मोहना खुर्द येथील दोघांना अटक केली असून, त्यांच्याकडून ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींनी मेहकर, डोणगाव, लोणार आणि जानेफळ परिसरात जवळपास आठ गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे. आरोपींनी दिली ८ गुन्ह्यांची कबुली: ८० हजारांचा मुद्देमाल जप्त आरोपींची नावे देवराज युवराज पवार (वय २२, रा. बिबी. ह.मु, मोहना खुर्द) आणि उमेश राजू पवार (रा.




मोहना खुर्द) अशी आहेत. डिसेंबर महिन्यात मेहकर तालुक्यातील जानेफळ परिसरात महादेव किसन मोहरूत यांच्या शेतातून १४१ नग स्प्रिंकलरच्या तोट्या चोरीला गेल्या होत्या. या प्रकरणी त्यांनी जानेफळ पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. याशिवाय, या टोळीशी संबंधित आणखी एक चोरीचा गुन्हा आधीच दाखल झाला होता

# भारतीय संस्कृतीचा गौरव- श्री गुरु तेगबहादुर साहिब...

हिंद दी चादर, म्हणजेच भारतभूमीचे कवच, अशी शीखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांची जगाला ओळख आहे. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेगबहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने नागपुरातील यशस्वी आयोजनानंतर आता नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी रोजी भव्य अशा आध्यात्मिक समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या निमित्ताने गुरु तेगबहादुर साहिब यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख: सत्याचा मार्ग आणि अहिंसेचे तत्त्व हे भारतीय विचारांचे एक अविभाज्य अंग आहे. हे तत्त्व केवळ शारीरिक हिंसा न करण्याइतपत मर्यादित नसून, अगदी मनातही कोणाबद्दल द्वेष बाळगू नये, असा त्याचा व्यापक अर्थ आहे. भारतीय संस्कृतीने जगाला विविधतेत एकता जोपासण्याचा मंत्रही दिला. ङ्गएकम सत् विप्रा बहुधा वदंतीफ म्हणजेच सत्य एकच आहे, परंतु विद्वान लोक ते वेगवेगळ्या प्रकारे मांडतात, हे ऋग्वेदातील सूत्र भारतीय संस्कृतीतील धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचा मूळ आधार मानले जाते. जिथे पाश्चात्य संस्कृती उपभोगावर भर देते, तिथे भारतीय संस्कृती त्याग आणि बलिदानाला महत्त्व देते. या मूळ विचारांचे स्मरण येथील जनसमुदायाला सातत्याने करून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी या भारतभूमीत जन्म घेतला. जगाला समता, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखविणाऱ्या शीख समुदायाच्या तेजस्वी परंपरेत जन्मलेले गुरु तेगबहादुर साहिब हे अशाच महापुरुषांपैकी आहेत. गुरु तेगबहादुर यांचे बलिदान हा भारतीय मध्ययुगीन इतिहासातील समर्पणाच्या भावनेचा महत्त्वपूर्ण आणि शाश्वत अध्याय ठरतो. श्री गुरु नानकदेव असोत, श्री गुरु तेगबहादुर साहिब असोत की श्री गुरु गोविंद सिंह साहिब असोत, या साऱ्या महापुरुषांनी परकीय जुलूमशाहीच्या काळात भारतभूमीतील जनतेचे स्वत्व, आत्मसन्मान जागविण्याचे तसेच दिशाहीन समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे श्री गुरु तेगबहादुर साहीब यांचे स्मरण झाले की आजही त्यांचे विचार आणि मानवतेसाठी त्यांनी दिलेल्या बलीदानाचा इतिहास डोळ्यापुढे सरकतो. गुरु तेगबहादुर साहिब यांचा जन्म १६२१ मध्ये अमृतसर येथे शीखांचे सहावे गुरु श्री हरगोविंद साहिब यांच्या घरी झाला. गुरु हरगोविंद साहिब यांच्या पाच पुत्रांपैकी ते धाकटे होते. ते अध्यात्मिक रंगात रंगलेले, अंतर्मुख आणि मौनप्रिय होते. गुरुपदाच्या गादीची जबाबदारी स्वीकारल्यावर गुरु तेगबहादुर साहिब यांनी शीख समाजाला संघटित करण्याचे प्रयत्न सुरु केले. १६६५ च्या सुमारास त्यांनी आनंदपूर नावाचे स्थळ वसवले. पुढे ते ङ्गआनंदपूर साहिबफ म्हणून प्रचलित झाले. शीख धर्मातील अत्यंत पवित्र अशा स्थळांपैकी ते एक मानले जाते. गुरु तेगबहादुर साहिब यांनी तत्कालीन बंगाल, बिहार, आसामसह देशातील अनेक भागांना भेटी देऊन आपल्या विचारांचा प्रचारप्रसार केला. १६६६ मध्ये पाटणा (पाटणा साहिब) येथेच त्यांच्या घरी गुरु गोविंदसिंह यांचा जन्म झाला. ते शीखांचे दहावे गुरु होत. साहित्य, उपदेश आणि आध्यात्म गुरु तेगबहादुर साहिब हे केवळ धर्मगुरुच नव्हते, तर ते उत्तम साहित्यिक आणि रचनाकारही होते. त्यांनी आपल्या अनेक रचनांच्या माध्यमातून शीख तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार केला. सहज सोप्या भाषेसह त्यांचा भावप्रवाह अतिशय सशक्त आहे. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू प्रामुख्याने वैराग्य, नाम ङ्गसिमरनफ (देवाचे स्मरण) आणि जीवनातील नश्वरता हाच ठरतो. त्यांचे विवेचनाचे विषयही धार्मिक, तत्त्वमिमांसक आणि जीवनातील क्षणभंगुरता दर्शवणारे आहेत. गुरु तेगबहादुर साहिब यांच्या रचनांना गुरु ग्रंथ साहिबमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचनांना सामान्यतः ङ्गशबदफ किंवा भजन म्हटले जाते. ज्यांत ईश्वर, मानवी संबंध, सेवा, मनशरीर, मृत्यु, प्रतिष्ठा आणि मानवी स्थिती यांसारख्या विषयांचा व्यापक आवाका आढळून येतो. गुरु तेगबहादुर सिंह साहीब यांच्या जीवनकार्याचा हा कालखंड भारतीय इतिहासातील अत्यंत आव्हानात्मक असा काळ मानला जातो. परकीय आक्रमकांनंतर दाखल झालेल्या तत्कालीन शासकांची सत्ता भारताच्या बऱ्याच भागात स्थिरावली होती. या सत्तेच्या कट्टरतेचा आणि आक्रमक विस्ताराचा असा काळ होता. मध्ययुगातील हाच काळ तत्कालीन शासकांच्या जुलमी राजवटीचाही मानला जातो. सत्ताधीश हे धार्मिकदृष्ट्या संकीर्ण आणि अत्यंत कडव्या मनोवृत्तीचे होते, असे इतिहास सांगतो. त्यामुळे स्वाभाविकपणे अन्य समुदायांसाठी हा काळ अतिशय खडतर आणि अस्थिरतेने परिपूर्ण असा काळ मानला जातो. अशा या प्रतिकूल परिस्थितीत गुरु तेगबहादुर यांनी अत्याचाराचा प्रतिकार अत्याचाराने नव्हे तर त्यागाने केला. गुरु तेगबहादुर साहीब यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सर्वोच्च बलिदान. साधरणतः १६७५ सालचा तो काळ होता. सत्ताधाऱ्यांच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या काश्मिरी पंडिताचे काही प्रतिनिधी आनंदपूर साहीब येथे गुरु तेगबहादुरांकडे मदत मागण्यासाठी आले होते. या लोकांना सक्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडले जात होते. काश्मिरी पंडितांची ही व्यथा ऐकून गुरु तेगबहादुर साहीब अतिशय धीरगंभीर झाले होते. अशा संकटापासून वाचण्यासाठी आता बलिदानाची गरज आहे, असे उत्तर त्यांनी यावर दिले. ङ्गजर आमच्या गुरुंनी धर्मांतर केलं, तर आम्ही सर्व स्वतः हून तुमचा धर्म स्वीकारूफ, असे सत्ताधीशाला जाऊन सांगण्याची सूचना त्यांनी काश्मिरी पंडितांना केली. पुढे गुरु तेगबहादुर साहीब हे दिल्लीला पोहचल्यावर बादशहाने त्यांना कैद केले. त्यांना प्रलोभने दाखविली गेली, धर्म स्वीकार करण्यास सांगण्यात आले. गुरुजींनी या दोन्ही गोष्टी नाकारल्या. त्यांच्या समक्षच त्यांच्या शिष्यांना शहीद करण्यात आले. पण, गुरु तेगबहादुर साहीब हे आपल्या निश्चयापासून अजिबात ढळले नाहीत. त्यांनी बादशहाचे आदेश मानण्यास नकार दिला. संतापलेल्या बादशहाने त्यांचे शीर धडावेगळे करण्याचे आदेश दिले. तो आदेश अखेर अंमलात आणला गेला. गुरु तेगबहादुर साहीब यांचे सर्वोच्च बलिदान ज्या ठिकाणावर झाले, ते ठिकाण आज दिल्लीच्या चांदणी चौक परिसरातील ङ्गसीस गंज साहिबफ गुरुद्वारा म्हणून ओळखले जाते. जर माझ्या बलिदानानं निरपराध लोकांच्या श्रद्धेचं रक्षण होणार असेल, तर तेच माझं सर्वोच्च धर्मकार्य ठरेलफ, असा संदेश त्यांनी त्यावेळी दिला होता. हे शब्द केवळ त्यागाचे नव्हते, तर संपूर्ण मानवतेच्या रक्षणाची घोषणा करणारे होते. धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवतेची सर्वोच्च मूल्य जपण्यासाठीच त्यांनी हा निर्णय घेतला होता. ङ्गसीस गंज साहिबफ गुरुद्वारा आजही त्यांचा त्याग आणि मानवतेप्रती समर्पणाची साक्ष देतो. शीखांचे गुरु असूनही गुरु तेगबहादुर साहीब यांनी देशाचे रक्षण करण्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते. ते सर्व धर्मांना समान मानणारे होते. सर्व मानव हे एकाच परमात्म्याचे पूत्र आहेत, अशीच त्यांची शिकवण होती. धर्म म्हणजे कर्तव्य आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग आहे, हा संदेश त्यांनी समस्त मानवजातीला दिला आहे. त्यांचा हा संदेश आजही प्रासंगिक ठरतो.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुंबईतही मनसेचा पाठिंबा घेणार? शिंदेंना थेट सवाल; भाईंनी एका वाक्यात विषय संपवला..

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महापालिकेत ठाकरे बंधूंनी महायुतीच्या विरोधात निवडणूक लढवली. पण निकालानंतर वेगळीच युती आकारास आली. भाजप आणि शिंदेसेनेकडे स्पष्ट बहुमत असताना कल्याण-डोंबिवलीत वेगळ्याच घडामोडी घडल्या. मनसेनं शिंदेसेनेला पाठिंबा दिला. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जबर धक्का बसला. या पार्श्वभूमीवर मुंबईतही मनसेचा पाठिंबा घेणार का, असा प्रश्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारण्यात आला . शिंदे यांनी एका वाक्यात या प्रश्नाला उत्तर दिलं.१६ जानेवारीला महापालिका निवडणुकीचा निकाल लागला. यानंतर २१ जानेवारीला मनसेनं शिंदेसेनेला कल्याण-डोंबिवलीत पाठिंबा जाहीर केला. याबद्दल मनसेचे





नेते बाळा नांदगावकर यांना विचारण्यात आलं. जे कल्याण-डोंबिवलीत केलं, तेच मुंबईतही करणार का, असा प्रश्न नांदगावकरांना विचारण्यात आला. त्यावर आता राजकारणात काहीही होऊ शकतं, असं सूचक विधान नांदगावकर यांनी केलं.मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांना विचारण्यात आलेला प्रश्न आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारला गेला. मुंबईतही मनसेचा पाठिंबा घेणार का, असा सवाल त्यांना करण्यात आला. त्यावर जर आणि तर वर बोलण्यापेक्षा आता काय आहे, त्यावर बोला, असं उत्तर शिंदे यांनी दिलं. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मुंबईत महायुतीचा महापौर होईल, असंही शिंदे म्हणाले.मुंबई महापालिकेची एकूण सदस्यसंख्या २२७ इतकी आहे. बहुमतासाठी ११४ चा आकडा गाठणं गरजेचं आहे. कोणत्याही पक्षाकडे बहुमत नाही. भाजप-शिंदेसेना युतीकडे ११८ नगरसेवकांचं बळ आहे. त्यांच्याकडे काठावरचं बहुमत आहे. मनसे चे ६ उमेदवार निवडून आले आहेत. उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे ६५ जण विजयी झाले आहेत. कल्याण-डोंबिवली प्रमाणेच मुंबईतही ठाकरे बंधूंची युती होती. कल्याण-डोंबिवलीत मनसेनं पलटी मारत सत्तेचा मार्ग धरला. त्यामुळे मनसे मुंबईत कल्याण-डोंबिवलीची पुनरावृत्ती करणार का, याकडे लक्ष लागलं आहे.

मनसेनं शिंदेसेनेला पाठिंबा दिल्याबद्दल शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला. स्थानिक नेत्यांनी शिंदेसेनेसोबत युती केल्याची माहिती राज ठाकरे ना नव्हती. त्यांनी पक्षप्रमुखांना अंधारात ठेवून युतीचा निर्णय घेतला. त्यामुळे राज ठाकरे व्यथित असल्याचं राऊत यांनी सांगितलं. तर दुसरीकडे मनसेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी युतीच्या निर्णयावर भाष्य केलं. राज ठाकरेंना शिंदेसेनेसोबतच्या युतीची पूर्ण कल्पना होती. त्यांना सांगूनच आम्ही स्थानिक पातळीवर निर्णय घेतला, असा दावा पाटील यांनी केला.

## 'शाळेला दांडी मारायची असली की बाळासाहेबांना मिठी मारायचो अन..'

**मुंबई :** हिंदुहृदयसम्राट आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आज मुंबईत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची एकाच व्यासपीठावरील उपस्थिती. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात अत्यंत भावूक होऊन केली. उद्धव ठाकरे यांनी आयुष्यातील बाळासाहेब आणि माँसाहेबांच्या हळव्या आठवणी सांगतानाच, राज्याच्या सध्याच्या राजकारणावर सडेतोड भाष्य केले. 'आम्ही वादळात खेळून मोठी झालेली मुलं आहोत, आम्हाला कुणी लढायला शिकवू नका,' अशा शब्दांत त्यांनी विरोधकांना आव्हान दिले.उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणात माँसाहेबांच्या म्हणजेच मीनाताई ठाकरे यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. 'माझी मा समयीच्या वातीसारखी होती, जी स्वतः जळत घर उजळून टाकत होती. प्रबोधनकारांची सून



आणि शिवसेनाप्रमुखांची पत्नी म्हणून घर सांभाळताना तिने आम्हाला बाहेरच्या वादळाची जाणीवही होऊ दिली नाही. शाळेत जायचा कंटाळा आला की मी बाळासाहेबांना घट्ट मिठी मारायचो आणि तेही मला समजून घ्यायचे,' अशा शब्दांत त्यांनी घराण्यातील नात्यांचे पदर उलगडले. विरोधकांकडून होणाऱ्या घराणेशाहीच्या आरोपांना उद्धव ठाकरेंनी सडेतोड उत्तर दिले. 'ठाकरे नाव पुसायला अनेक जण मैदानात उतरले आहेत, पण ते नाव पुसलं जात नाहीये. आम्ही ज्या घराण्यात जन्मलो, त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. ज्यांना स्वतःच्या वडिलांचे नाव घ्यायला लाज वाटते, त्यांना मी काही करू शकत नाही.

## बाळासाहेबांच्या शिवसैनिकाची लेक महापौर होणार?

**मुंबई :** मुंबई महापालिकेचं महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव झालेलं आहे. भाजपकडे असलेलं संख्याबळ पाहता त्यांनी हे पद शिंदेसेनेला सोडण्यास नकार दिला आहे. बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष असल्यानं या वर्षात महापौर आपल्या पक्षाला मिळावं, अशी शिंदेसेनेची मागणी होती. पण भाजपनं त्यास स्पष्ट शब्दांत नकार दिल्याचं समजतं. यानंतर भाजपच्या गोटातून काही नगरसेविकांची नावं महापौरपदासाठी चर्चेत आहेत. यात शीतल गंभीर-देसाई यांचं नाव आघाडीवर आहे.मुंबई महापालिकेचं महापौरपद सलग दुसऱ्यांदा खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झालं आहे. यानंतर भाजपमधील चार ते पाच नगरसेविकांची नावं महापौरपदासाठी चर्चेत आहेत. यात शीतल गंभीर-देसाई यांचं नाव पुढे आहे. त्या प्रभाग क्रमांक १९० मधून विजयी झाल्या आहेत. त्यांनी शिवसेना उबाठाच्या उमेदवार वैशाली पाटणकर यांचा अटीतटीच्या लढतीत पराभव केला. गंभीर अवघ्या १२५ मतांनी विजयी झाल्या.

## बंड घडवून आणल्याचा दावा करणाऱ्या तानाजी सावंतांच्या घरातच बंड

**धाराशिव :** शिवसेनेतील बंड घडवून आणल्याचा दावा करणारे माजी मंत्री तानाजी सावंत आज स्वतःच्या घरातील बंडामुळे अडचणीत सापडले आहेत. पुतणे धनंजय सावंत यांची उघड बंडखोरी आणि दुसरीकडे भाजपकडून पुतणे पृथ्वीराज सावंत यांना मिळालेली उमेदवारी यामुळे सावंत कुटुंबातील राजकीय संघर्ष चव्हाट्यावर आला आहे.राज्याचे माजी मंत्री तानाजी सावंत हे वादग्रस्त वक्तव्ये आणि परखड, आक्रमक बोलण्याच्या शैलीमुळे कायम चर्चेत राहणारे नेते आहेत. शिवसेनेतील बंड आपणच घडवून आणल्याचा दावा त्यांनी जाहीर सभांमध्ये ठामपणे केला होता. या बंडासाठी जवळपास दीडशे बैठका घेतल्याचं त्यांनी स्वतः सांगितलं होतं.मात्र, शिवसेनेचं बंड यशस्वी करणारे तानाजी सावंत आपलं कुटुंब एकसंध ठेवण्यात अपयशी ठरताना दिसत आहेत. आधी अनिल सावंत, त्यानंतर शिवाजी सावंत, मग पृथ्वीराज



सावंत आणि आता धनंजय सावंत एकामागोमाग एक सावंत कुटुंबीयांनीच तानाजी सावंत यांच्या विरोधात बंडाचा झेंडा हाती घेतल्याचं चित्र आहे. आक्रमक आणि वादग्रस्त भाषाशैलीमुळेच सावंत कुटुंबाची राजकीय वाताहात होत असल्याची चर्चा सुरू आहे. तानाजी सावंत यांचे पुतणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत हे शिवसेनेकडून धाराशिव लोकसभा लढवण्यासाठी इच्छुक होते. त्यासाठी त्यांनी कार्यकर्त्यांसह ठाण्यात पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. योग्य वेळी निर्णय घेऊ, असा शब्द त्यांना देण्यात आला होता.

# डॉक्टरनं पक्ष बदलला की काय? राज ठाकरेंनी किस्सा सांगितला

**मुंबई :** राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता, बाळासाहेब ठाकरे आज आपल्यात नाहीत, ते बरंच आहे. आज तो माणूस असता, तर किती व्यथित झाला असता. त्याला किती वेदना झाल्या असत्या, अशा शब्दांत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सध्यस्थितीवर तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. राज ठाकरेंनी त्यांच्या भाषणाची सुरुवात इथे बसलेल्या बाळासाहेब ठाकरे प्रेमी बंधूंनो, भगिनींनो आणि मातांनो अशा खास शब्दांनी केली.महापालिका निवडणुकीनंतर मी आजारी पडलो. पालिका निवडणुकीआधी उद्धव ठाकरे आजारी होते. आता आजारी असल्यामुळे मला फार बोलता येणार नाही, असं राज ठाकरे भाषणाच्या सुरुवातीलाच म्हणाले. उद्धव ठाकरे आणि स्वतःच्या आजारपणाचा किस्साही त्यांनी यावेळी



सांगितला. 'महापालिका निवडणुकीच्या आधी मी आजारी होतो. तेव्हा मी आमचे फॅमिली डॉक्टर यादव यांच्याकडून औषधं घेतली आणि त्यांना दिली. यादव म्हणजे मराठी यादव हा,' असं राज ठाकरे मिश्किलपणे म्हणाले.यादव डॉक्टरांनी औषधं दिली. उद्धव ठाकरेंनी औषधं घेतली आणि ते दोन दिवसांत बरे झाले. त्यानंतर मी आजारी पडलो. मी पण त्यांच्याकडूनच औषधं घेतली. आज सहा दिवस झाले औषध घेतोय. पण अजून बरं वाटलं नाही. त्यामुळे मी परवा उद्धव ठाकरेंना फोन केला आणि म्हटलं, माझ्या डॉक्टरनं पक्ष बदलला की काय?, असं राज ठाकरे यांनी सभेत सांगताच एकच हशा पिकला.बाळासाहेब ठाकरेंच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू होते. त्यामुळे प्रत्येकाला ते वेगळे वाटले. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल मी आणि उद्धव अगदी तासनतास बोलू शकतो. आम्ही लहानपणापासून त्यांना पाहात आलो. व्यंगचित्र रेखाटताना त्यांची अक्षरशः समाधी लागायची. त्यावेळी बाहेर किती काय काय सुरु होतं. दंगली, आंदोलनं, राडे या सगळ्या सभोवताली घडत होत्या. पण बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्र काढायला बसले की अतिशय तल्लीन व्हायचे. बाहेर इतकं सगळं सुरु असताना त्यांच्या व्यंगचित्रातला विनोद कधी हलला नाही. त्यांच्यासारखी समाधी लागणं निव्वळ अशक्य, अशा शब्दांत राज ठाकरेंनी बाळासाहेबांमधील व्यंगचित्रकार उलगडून सांगितला.

विजय तेंडुलकर यांचं एक पुस्तक आहे. त्या पुस्तकाचं शीर्षक आहे, ये सारं येतं कुठून? बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पाहून हाच प्रश्न पडायचा. ते व्यंगचित्रकार होते. ते हिंदूहृदयसम्राट होते. ते शिवसेनेचे पक्षप्रमुख होते. त्यांच्याबद्दल मला एकदा व्याख्यान द्यायचं आहे. बाळासाहेबांचे अनेक किस्से आहेत. पण त्यातील बरेचसे तुम्हाला सांगू शकत नाही आणि त्याचं कारण म्हणजे भाषा. तुम्ही भाषणांमधून त्यांच्या भाषेची केवळ झलक पाहिली आहे. आम्ही त्यांना रोज पाहायचो. त्यांना बघत बघतच आम्ही लहानाचे मोठे झालो, अशा शब्दांत राज यांनी बाळासाहेबांच्या आठवणी जागवल्या.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बदलापूर हादरलं; चार वर्षीय चिमुकलीसोबत स्कूलव्हॅन चालकाकडून संतापजनक कृत्य

**ठाणे :** बदलापूर शहरात पुन्हा एका चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची संतापजनक घटना घडली आहे. याआधी बदलापूरच्या एका नामांकित शाळेत चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराची घटना समोर आली होती. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. पोलिसांनी Badlaur Crime प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर केला होता. त्यानंतर आता पुन्हा अशी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. बदलापुरात ४ वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्कूलव्हॅन चालकाने चिमुरडीवर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. तर चिमुकलीची सध्या वैद्यकीय तपासणी सुरु असल्याची माहिति



आहे.बदलापूर पश्चिमेत स्कूल व्हॅनमध्ये चार वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचार प्रकरणानंतर प्रशासन खडबडून जागे झाले असून, कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयाने संबंधित स्कूल व्हॅनवर कडक कारवाई केली आहे. तपासादरम्यान या स्कूल व्हॅन चालवण्यासाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या गंभीर निष्काळजीपणाची दखल घेत ठढजने संबंधित व्हॅनचा परवाना रद्द करत २४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.ही घटना उघड झाल्यानंतर शहरात एकच खळबळ उडाली आहे. संबंधित स्कूल व्हॅनची तोडफफोडकरण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्या संगीता चेंदवनकर यांच्याकडून संबंधित व्हॅनवर दगडफेक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, बदलापूर पोलीस ठाण्यात तणावाचं वातावरण असल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा चिमुकलीला स्कूल व्हॅनमधून शाळेत घेऊन जात होता. या दरम्यान त्याने चिमुकलीसोबत स्कूल व्हॅनमध्ये गैरवर्तन केले. यावेळी आरोपीने पीडित चिमुकलीला मारहाण देखील केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे हे प्रकरण खूप भयंकर असल्याचे संकेत मिळत आहेत. पोलिसांनी घटनेचं गांभीर्य ओळखून स्कूल व्हॅन चालकाला अटक केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या संगीता चेंदवणकर या घटनेनंतर प्रचंड आक्रमक झाल्या आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून प्रशासनाने काही नियम तयार केले होते. त्या नियामांचे पालन का झाले नाही? असा जाब त्यांनी विचारला आहे. दरम्यान, पोलीस ठाण्याच्या आवारात संबंधित स्कूल व्हॅन आली तेव्हा चेंदवणकर आणि त्यांच्यासोबतच्या काही महिला कार्यकर्त्यांनी त्या गाडीची तोडफफोड करण्याचा प्रयत्न केला.

## नर्सरीतील शेडला भीषण आग; दाराला कडी लाऊन पती पळाला

**सांगली :** शहरातील विश्रामबाग परिसरात असलेल्या शंभर फुटी रोडवरील शांतीबन चौक येथे एका नर्सरी मधील पत्रावजा शेडला आज रात्री साडे दहाच्या सुमारास अज्ञात कारणातून भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत विवाहितेचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. निकिता शिव मनगुळे (वय २५ मूळ राहणार कागवाड, बसवनगर) असे मृत महिलेचे नाव असून संशयित पती शिव मनगुळे हा पसार झाला आहे. दरम्यान, या प्रकरणी काही संशयास्पद गोष्टी समोर आल्याने पोलिसांचा सखोल तपास सुरू असल्याची माहिती आहे.घटनास्थळी आणि सांगली पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शहरातील शंभर फुटी रोडवर चौकात एक नर्सरी आहे. देखभालीसाठी कर्नाटकातील एक दाम्पत्य या ठिकाणी राहत होते. आज शुक्रवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास ते राहत असलेल्या पत्र्याच्या शेडला भीषण आग लागली. धुराचे मोठे लोट येऊ लागले. बघता - बघता काही क्षणात आगीने रौद्ररूप धरण केले. रस्त्यावरून



येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास सदरची घटना येताच त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला सदरच्या घटनेची माहिती दिली.अग्निशमन दलाने क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. यावेळी सुनील माळी, प्रसन्न पाटील, दत्त पाटील, सुरेश अलगुर यांच्या पथकाने धाव घेतली. मात्र, या भीषण आगीत महिलेचा होरपळून मृत्यू झाला होता१०० फुटी रस्त्यावरील कोळी यांच्या मयुर नर्सरीत असणाऱ्या शेडमध्ये दाम्पत्य राहत होते. आगीच्या घटनेनंतर मृत महिलेचा पती घटनास्थळावरून पसार झाल्याचे पोलिसांनी सांगितले. पत्र्याच्या शेडला बाहेरून कडी लावली होती. अग्निशमन दलाच्या जवानांनी पत्र्याचे शेड उचकटून आत प्रवेश करत आगीवर नियंत्रण मिळवले.

## बॉयफ्रेंडच्या मदतीने पतीला संपवल

**अमरावती :** एका पत्नीने तिच्या प्रियकरासह तिच्या पतीची हत्या केली. प्रथम त्यांनी त्याच्या जेवणात बेशुद्धीचं औषध मिसळले. तो बेशुद्ध झालेल्या पतीची उशीने तोंड दाबून त्याची हत्या केली. धक्कादायक बाब म्हणजे. हत्येनंतर या पत्नीने संपूर्ण रात्र तिच्या पतीच्या मृतदेहाशेजारी बसून अश्लील चित्रपट पाहिले. आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यात ही भयंकर घटना घडली.सकाळी महिलेने सर्वांनी सांगितलं की पतीचा मृत्यू हृदयविकाराचा झटक्याने झाला. मात्र, शेजाऱ्यांना संशय आला आणि त्यांना पतीच्या शरीरावर जखमा दिसल्या. त्यांनी पोलिसांत याची तक्रार केली. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला ज्यात ही धक्कादायक कहाणी समोर आहे.ही घटना आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यातील चिलुवूरु गावात घडली. आरोपी महिलेची ओळख लक्ष्मी माधुरी अशी झाली आहे. मृत पती लोकम शिवा नागराजू हा कांदा व्यापारी होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या जोडप्यामध्ये दीर्घकाळापासून वाद सुरू होता. या काळात, महिलेचं गोपी नावाच्या व्यक्तीसोबत सूत जुळले होते.

## वाद अन काकाने पुतण्याला संपवलं, झोपेत हल्ला करत शेतात लपला


**बुलढाणा :** घरगुती घडलेल्या किरकोळ वादातून काकानेच २४ वर्षीय पुतण्याची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना बुलढाण्याच्या चिखली तालुक्यातील हातनी गावामध्ये घडली आहे. या घटनेने गावात एकच खळबळ उडाली आहे. गोपाल अजबराव जाधव (वय २४) असं हत्या झालेल्या पुतण्याचं नाव आहे. तर, विनोद जाधव असं हत्या करणाऱ्या आरोपी काकाचं नाव असल्याची माहिती आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी काकाला ताब्यात घेतलं आहे. विनोद रामचंद्र जाधव आणि पुतण्या गोपाल अजबराव जाधव यांच्यामध्ये बुधवारी (२१ जानेवारी) सायंकाळी किरकोळ वाद झाला होता. वाद एवढा विकोपाला गेला की, रात्री आरोपी विनोद जाधव याने गोपाल जाधव याच्या डोक्यात आणि छातीवर कुऱ्हाडीने वार करून जखमी केले, ज्यामध्ये गोपालचा जागीच मृत्यू झाला.मृत तरुण हा घरात झोपलेला असताना त्याच्यावर वार करण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेनंतर आरोपी विनोद जाधव हा फरार झाला होता, मात्र चिखली पोलिसांनी अवघ्या दोन तासातच आरोपीचा शोध घेत




त्याला अटक केली आहे.घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तात्काळ चिखली पोलिसांना कळवलं. मात्र, पोलिस येत असल्याची खबर आरोपी याला लागताच तो अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला. अंधारात तो मक्याच्या शेतात लपून बसल्याचं समोर आलं. चिखली पोलिसांनी कसून शोध मोहीम राबवत अवघ्या दोन तासांत आरोपीला शेतातून ताब्यात घेतलं.ही धडक करावाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनात चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे, पोलीस उपनिरीक्षक शरद भागवतकर, उपनिरीक्षक नितीनसिंग चव्हाण, विजय किटे बिट जमदार अनिल वाघ, डी बी पथक अमोल गवई, प्रशांत धंदर, राहुल पायघन, अजय इटावा, अमोल इंगळे यांनी केली.

## ओयो हॉटेलमध्ये आले, दोघांमध्ये वाद अन बॉयफ्रेंडने रुचिताला संपवलं

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर रोडवरील फेटरी गाव परिसरात असलेल्या एका ओयो हॉटेलमध्ये प्रेमसंबंधातून घडलेल्या निर्घृण हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरून गेले आहे. प्रियकरानेच आपल्या प्रेयसीच्या गळ्यावर चाकूने वार करून तिची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मृत तरुणीचे नाव रुचिता राजेंद्र भांगे (वय २१) असे असून, तिचा मूळ मुक्काम आष्टी खुर्द, कळमेश्वर येथे आहे. सध्या ती गिट्टीखदान परिसरात वास्तव्यास होती. आरोपी प्रियकराचे नाव सौरभ जामगडे (वय २४, रा. आष्टी खुर्द) असे आहे.प्राथमिक माहितीनुसार, गुरवारी






दोघेही संबंधित ओयो हॉटेलमध्ये दाखल झाले. खोलीत गेल्यानंतर काही वेळातच त्यांच्यात वाद सुरू झाला. हा वाद इतका टोकाला गेला की संतप्त झालेल्या सौरभने जवळील चाकूने रुचिताच्या गळ्यावर जोरदार वार केला. या हल्ल्यात रुचिता गंभीर जखमी झाली. हॉटेल कर्मचाऱ्यांना काही समजण्याच्या आतच तिचा प्रचंड रक्तस्राव झाला आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाला. आरोपी प्रियकराने पुरावे नष्ट करण्याचा आणि पोलिसांच्या हाती न लागण्याचा प्रयत्न करत हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारून पळ काढल्याची माहिती आहे.घटनेची माहिती मिळताच हॉटेल प्रशासनाने तत्काळ कळमेश्वर पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी हॉटेलमधील खोलीची पाहणी करून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत.हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, आरोपीच्या हालचालींचा माग काढण्याचे काम सुरू आहे. तसेच, मृत तरुणी आणि आरोपी यांच्यातील प्रेमसंबंध, वादाचे नेमके कारण आणि घटनेमागील पार्श्वभूमीचा सखोल तपास केला जात आहे. दरम्यान, प्रेमप्रकरणातून वाढत चाललेल्या हिंसक घटनांमुळे नागपूर शहरातील कायदा - सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# इशानपुढे न्यूझीलंडचे लोटांगण, सूर्याची तुफानी खेळी, भारताची मालिकेत आघाडी







**रायपूर/वृत्तसंस्था :** इशान किशनच्या वादळापुढे न्यूझीलंडच्या गोलंदाजांना लोटांगण घालण्याची वेळ दुसऱ्या टी २० सामन्यात आली. इशानने सुरुवातीपासून न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर जोरदार प्रहार केला आणि प्रत्येक षटकात धावांची बरसात केली. इशीन किशनच्या तुफानी फटकेबाजीच्या जोरावर भारताला या सामन्यात मोठा विजय मिळवता आला. न्यूझीलंडने या सामन्यात २०८ धावा केल्या होत्या. भारताने इशान किशन आणि सूर्यकुमार यादवच्या खेळींच्या जोरावर ते लिलया पेलले. भारताने या सामन्यात न्यूझीलंडवर सात विकेट्स राखून विजय मिळवला आणि मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. इशानने या सामन्यात ७६, तर सूर्याने नाबाद ८२ धावांची खेळी साकारली.भारताची या सामन्यात वाईट सुरुवात झाली होती. भारताने दोन्ही सलामीवीर लवकर हाद झाले, त्यामुळे भारताची २ बाद ६ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण त्यानंतर इशान किशनचे वादळ मैदानात घोंदावले. कारण इशान किशनने धडाकेबाज फटकेबाजीला सुरुवात केली आणि त्याने न्यूझीलंडच्या गोलंदाजांच्या तोंडचे पाणी पळवले. इशान किशनने यावेळी फक्त २१ चेंडूंत आपले अर्धशतक झळकावले आणि त्याने शतकाच्या दिशेने कूच करायला सुरुवात केली. पण इशीन किशनचे शतक मात्र यावेळी हुकले. इशान किशनने यावेळी फक्त ३२ चेंडूंत ११ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ७६ धावांची दिमाखदार खेळी साकारली. इशान बाद झाला तरी त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने आपली धमाकेदार फटकेबाजी सुरुच ठेवली.सूर्यकुमार यादवने यावेळी जलदगतीने आपले अर्धशतक झळकावले आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब त्याने करून दिले. सूर्याने यावेळी शिवम दुबेला आपल्या साथीला घेतले आणि या दोघांनीही रनरेट वाढवण्याची जबाबदारी चोख बजावली. भारताने या सामन्यात विजय साकारला. भारताचा हा सलग दुसरा विजय ठरला आहे, त्यामुळे भारताकडे या मालिकेत आता २-० अशी आघाडी झाली आहे. न्यूझीलंडच्या डावाची सुरुवात चांगली झाली. तीन षटकांत त्यांनी ४३ धावा केल्या होत्या, पण त्यानंतर दोन्ही सलामीवीर त्यांनी लगेच गमावले आणि त्यांना दुहेरी धक्के बसले. त्यानंतर राचिन रवींद्रने २६ चेंडूंत ४४ धावांची दमदार खेळी साकारली, तो बाद झाला त्यानंतर न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने २७ चेंडूंत नाबाद ४७ धावांची खेळी साकारली. त्यामुळे न्यूझीलंडला यावेळी २०८ धावा करता आल्या.

## इशानने १५ चेंडूंत केल्या ६८ धावा

**रायपूर :** इशान किशनने दुसऱ्या टी २० सामन्यात तर कहरच केला. भारताची २ बाद ६ अशी दयनीय अवस्था झाली होती. पण त्यावेळी भारतासाठी धवून आला तो इशान किशन. या सामन्यात इशान किशनने फक्त भराताला सावरले नाही तर त्याने आपल्या तुफानी फलंदाजीच्या जोरावर भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला.इशान किशनने यावेळी भारताचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद झाले तरी त्याचे दडपण घेतले नाही. इशान किशनने सुरुवातीपासून न्यूझीलंडच्या गोलंजांची धुलाई करायला सुरुवात केली. न्यूझीलंडला संघ भारतावर दडपण टाकण्याचा प्रयत्न करत होता, पण इशान किशनने हे दडपण झुगारून लावले. इशान किशनने या सामन्यात न्यूझीलंडच्या गोलंदाजीवर असा प्रहार करायला सुरुवात केला की, प्रत्येक षटकात १० पेक्षा जास्त धावा सहजपणे यायला लागला. भारताचे दोन विकेट्स पडल्या होत्या, सूर्या फलंदाजीला आला होता. सूर्या चांगल्या फॉर्मात नव्हता, त्यामुळे तो संथपणे खेळत होता. सूर्याने १० चेंडूंत फक्त १० धावा केल्या होत्या, पण त्याची ही खेळी संथ वाटली नाही ती इशान किशनच्या धमाकेदार फटकेबाजीमुळे. कारण इशान किशनने एकही षटक असेल सोडले नाही की, ज्यामध्ये त्याने चेंडू सीमापार धाडला नाही. इशान किशनने यावेळी फक्त १५ चेंडूंत ६८ धावा केल्याचे पाहायला मिळाले.

## राणाने विकेट काढली पण चारचा आकडा का दाखवला




**रायपूर/वृत्तसंस्था :** हर्षित राणा भारतासाठी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. कारण हर्षितने आपल्या पहिल्याच षटकात भारताला पहिली विकेट मिळवून दिली. पण यावेळी विकेटचे सेलिब्रेशन करत असताना हर्षित राणाने चारचा आकडा का दाखवला, याचा अर्थ आता समोर आला आहे.ही गोष्ट घडली ती चौथ्या षटकात. न्यूझीलंडने तीन षटकांत ४३ धावा चोपून काढल्या होत्या. पण त्यानंतर चौथ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ही गोष्ट घडल्याचे पाहायला मिळाले. यावेळी न्यूझीलंडचा सलामीवीर डेवॉन कॉनवे हा मोठी फटकेबाजी करण्यासाठी सज्ज झाला होता. या षटकाच्या पहिल्या चेंडूवर कॉनवेने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला होता, पण तो अपयशी ठरला होता. त्यामुळे आता दुसऱ्या चेंडूवरही तो मोठा फटका अशी त्याची देलबोली दिसत होती. या दुसऱ्या चेंडूवर कॉनवे मोठा फटका मारण्यासाठी गेला. कॉनवेने मोठा फटकाही मारला. पण यावेळी त्याचे टायमिंग चुकले आणि चेंडू हवेत उंच उडाला.कॉनवेने मारलेला चेंडू हा हवेत उडाला होता आणि त्याच्या खाली हार्दिक पंड्या आला होता. हा चेंडू त्याच्या हातावर आदळला आणि पुन्हा हवेत उडाला, पण हार्दिकने यावेळी ही कॅच मात्र पकडली. भारतासाठी ही पहिली विकेट होती. पण यावेळी हर्षितने सेलिब्रेशन करताना चार हा आकडा दाखवला. हा चार आकडा दाखवण्याचा अर्थ असा होता की, हर्षितने गेल्या सलग चार डावांमध्ये कॉनवेला यावेळी बाद केले. वनडे मालिकेतील तिन्ही सामन्यांत हर्षितने त्याला बाद केले होते, आता या सामन्यात हर्षित त्याच्यासमोर चौथ्यांदा आला होता आणि यावेळी त्याने कॉनवेला बाद केले. त्यामुळे सलग चार डावांमध्ये हर्षितने कॉनवेला बाद केले आणि त्यामुळे त्यो सेलिब्रेशन करत अससताना त्याने चार हा आकडा दाखवला.हर्षित राणाने यावेळी हे भन्नाट षटक टाकले.

# बांगलादेशची त्यांच्या खेळाडूंनीच जगसमोर लाज काढली, वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकताना काय केलं, आता आलं समोर






**दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशची आता जगासमोर त्यांच्याच देशाच्या खेळाडूंनी जगासमोर लाज काढली आहे. कारण बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकताना नेमकं काय केलं, हे आता बांगलादेशच्या खेळाडूंनी सांगितलं आहे. त्यामुळे बांगलादेशची जगासमोर आता लाज गेली आहे.बांगलादेशचा खेळाडू मिस्ताफिझूर रेमहमानला बीसीसीआयने वर्ल्ड कपमधीन बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर बांगलादेश खळवला आणि त्यांनी थेट भारतामधील वर्ल्ड कपचे सामने आम्ही खेळणार नाही, असा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांनी आयसीसीलाही सांगितला. आपण वर्ल्ड कपच्या सर्व सामन्यांचे आयोजन झाले असल्यामुळे आता कोणत्याही देशाचे सामने दुसरीकडे हलवण्यात येणार नाही, असे आयसीसीने बांगलादेशला कळवले. बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने ही गोष्ट सरकारला सांगितली. बांगलादेशच्या सरकारने या सर्व गोष्टींना अंदाज घेतला आणि बांगलादेशचे खेळाडू भारताम ध्ये जाऊन वर्ल्ड कप खेळणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. पण आता बांगलादेशच्या खेळाडूंनी सर्व खरी गोष्ट संगितली आहे.बांगलादेशच्या वर्ल्ड कप संघातील एका खेळाडूने नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले की, ' वर्ल्ड कपसारख्या मोठ्या स्पर्धेवर बहिष्कार टाकणे ही सर्वात मोठी गोष्ट आहे. कारण वर्ल्ड कप हा चार वर्षांनी एकदा येत असतो आणि त्यामध्ये खेळण्यासाठी प्रत्येक खेळाडू आसूसलेला असतो. वर्ल्ड कप खेळणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. जेव्हा एवढा म ोठा निर्णय घेतला जातो, तेव्हा संघातील खेळाडूंना विश्वासात घेतलं जातं. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे खेळाडूंना विचारलं जातं की, याबाबत आपण काय निर्णय घ्यायला हवा. कारण कधीही खेळ आणि खेळाडू यांचा सन्मान ठेवायला हवा. कारण खेळाडू मेहनत घेत असतात आणि ते आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून संघाला विजय मिळवून देत असतात. पण एवढा मोठा निर्णय घेत असताना मात्र खेळाडूंना कोणतीच गोष्ट विचारली नाही. आम्ही थेट निर्णयच क्रिकेट संघटनेने सांगितला. त्यामुळे बांगलादेशच्या क्रिकेट संघटनेने खेळाडूंची काही किंमतच केली नसल्याचे यावेळी पाहायला मिळाले. 'बांगलादेशने वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला खरा, पण हे करत असताना त्यांनी नेमकं काय केलं हे आता समोर आलं आहे.

# ब्रेकअपच्या चर्चा अनब युजवेंद्र चहलनं साधला आरजे महवशवर निशाणा?

**मुंबई :** धनश्री वर्मासोबत घटस्फोट झाल्यापासून युजवेंद्र चहलचं नाव आरजे महवशसोबत जोडलं गेलं. गेल्या वर्षी आयपीएल सामन्यांदरम्यान दोघे एकत्र दिसले होते. महवश अनेक वेळा चहलला पाठिंबा देतानाही दिसली, ज्यामुळे त्यांच्या डेटिंगच्या अफवांना हवा मिळाली. शिवाय, चहल आणि महवश अलीकडेच लंडनच्या ट्रिपवर गेले होते. दोघांनीही लंडनमधील काही ठिकाणांचे फोटो त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवर शेअर केले. पण, आजपर्यंत दोघांनीही त्यांच्या नात्याची कोणतीही अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही.

अलिकडेच दिलेल्या मुलाखतीदरम्यान, जेव्हा चहलला महवशसोबतच्या त्याच्या नात्याबद्दल विचारण्यात आलं तेव्हा त्यानं 'चांगले मित्र' असं म्हटलं. मॅशेबल इंडियाला दिलेल्या मुलाखतीत चहल म्हणाला, 'मित्र, म्हणून फिरायला काहीच हरकत नाही ना! लगेच व्हिडिओ व्हायरल होतात. आमचं कोणतंही नातं नाही. मी आनंदाने सिंगल आहेयुजवेंद्र आणि आरजे महवश पूर्वी सोशल मीडियावर एकमेकांना फॉलो करत होते. पण आता





त्यांनी एकमेकांना अनफॉलो केलं आहे, त्यामुळे सोशल मीडिया युजर असा अंदाज लावत आहेत की, चहल आणि महावशच्या नात्यात दुरावा आला आहे दरम्यान, आरजे महवशने एक क्रिप्टीक व्हिडिओ शेअर करून चहलसोबतच्या तिच्या ब्रेकअपच्या अफवांना खतपाणी घातलं आहे. व्हिडिओमध्ये, महवश म्हणतेय, '२०२६ मध्ये, माझं 'फिक्स-इट' वर्तन सर्वांनाच कळलं आहे. तू एक वाईट काम केलंस आणि तू माझ्या आयुष्यातून निघून गेला आहेस. कोणाच्या वाईट व्यक्तिमत्त्वावर काम करण्याची माझ्यात हिंमत नाही. मला माझ्या स्वतःच्या मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. ती एक चूक होती, मला वाटले नव्हतं की ते घडेल, म्हणून ते सोडून द्या.'चुकून काहीही घडत नाही; सर्व काही विचारपूर्वक केलं जातं.' असं आरजे म्हणाली. गुरुवारी चहलनं त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक फोटोही पोस्ट केला. त्यात लिहिलं होतं की, 'कृष्णाने अर्जुनला सांगितलंय की, प्रत्येकजण तुमच्या स्पष्टीकरणास पात्र नाही. कधीकधी गप्प राहणं आणि लोक चुकीचे आहेत हे स्वीकारणं योग्य आहे.' आता, युजर्स चहलची ही पोस्ट महावशसोबत जोडत आहेत२०२५ मध्ये क्रिकेटपटू युजवेंद्र चहलने कोरिओग्राफर धनश्रीला घटस्फोट दिला. त्यानंतर, तो आरजे महवशसोबत दिसला. महवश अनेक क्रिकेट सामन्यांदरम्यान युजवेंद्रला पाठिंबा देताना दिसली. यामुळे दोघांमध्ये अफेअरच्या अफवा पसरल्या. आता, मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्यांनी एकमेकांना अनफॉलो केलं आहे. यावरून त्यांच्या नात्यात आणि मैत्रीत दुरावा आला असल्याचं दिसून येतंय.

## अभिनेत्यानं काडीमोड न घेताच उरकलं दुसरं लग्न, लेकीला धक्का..



**मुंबई :** पश्चिम बंगालमधील खरगपूर सदर मतदारसंघातील अभिनेता आणि भाजप आमदार हिरन चॅटर्जी दुसऱ्या लग्नामुळे चर्चेत आहे. अभिनेत्यानं मॉडेल आणि अभिनेत्री रितिका गिरीसोबत गुपचूप लग्न केलं. यामुळे वाद निर्माण झाला आहे. हिरनची पहिली पत्नी अनिंदिता आणि मुलगी नियासा चॅटर्जी यांनी या प्रकरणाचा निषेध करत तक्रार दाखल केली आहे. अनिंदिताचा दावा आहे की, हिरनने तिला घटस्फोट न देता बेकायदेशीरपणे दुसरं लग्न केलं. दरम्यान, मुलगी नियासा दुःखी झाली आहे. नियासानं सांगितलं की, तिला वडिलांच्या दुसऱ्या लग्नाबद्दल सोशल मीडियाद्वारे कळलं.अनिंदिता चॅटर्जीची मुलगी नियासा म्हणाली की, तिला तिच्या वडिलांच्या रितिका गिरीशी दुसऱ्या लग्नाबद्दल सोशल मीडियाद्वारे कळलं. अभिनेता त्याच्या पहिल्या कुटुंबाशी संपर्कात नाही. हिरन आणि रितिकानं वाराणसीमध्ये गुपचूप लग्न केलं. हिरनने लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. पण, वाद निर्माण झाल्यानंतर ते नंतर डिलीट करण्यात आले. लग्नानंतर, अभिनेत्याची पहिली पत्नी अनिंदिता आणि मुलगी नियासा यांनी अभिनेत्यावर छळ केल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली. त्यांनी असंही म्हटलं की, हिरनने रितिकाशी कायदेशीररित्या घटस्फोट न घेता लग्न केलं.रितिकाचा दावा आहे की, अनिंदिताला त्यांच्या नात्याबद्दल काही काळापासून माहिती होती. नियासाने तिच्या आईसोबत इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर असून कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'तू माझी आई, माझे वडील, माझी मार्गदर्शक आहेस. या सर्वांसाठी धन्यवाद. तू माझी खरी हिरो आहेस, आई'अनिंदिता आणि नियासाने गेल्या बुधवारी हिरन आणि रितिकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.



## विवाहित दिग्दर्शकाच्या प्रेमात, लग्न न करताच राहिलेली प्रेग्नन्ट; वादग्रस्त ठरलं रम्याचं आयुष्य

**मुंबई :** ५५ वर्षीय या अभिनेत्रीनं केवळ दाक्षिणात्य सिनेमांमध्येच प्रसिद्धी मिळवली नाही तर अनेक बॉलिवूड चित्रपटांमध्येही काम केलं आहे. या अभिनेत्रीनं अमिताभ बच्चन यांच्यासोबत एका सुपरहिट चित्रपटातही काम केलंय. मात्र, या अभिनेत्रीचं वैयक्तिक आयुष्य वादांनी भरलेलं आहे.आपण ज्या अभिनेत्रीबद्दल बोलत आहोत ती दुसरी तिसरी कोणी नसून रम्या कृष्णन आहे. या अभिनेत्रीनं 'बाहुबली' मध्ये 'शिवगामी' च्या भूमिकेने प्रचंड लोकप्रियता मिळवली. रम्या ही देशातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ती प्रत्येक चित्रपटासाठी ३ ते ४ कोटी रुपये घेते. २०२४ मध्ये, तिनं 'गुंटूर करम' आणि 'पुरुषोत्तमदु' या दोन मोठ्या बजेट चित्रपटांमध्ये काम केलं.रम्याने तिच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात सी.व्ही. श्रीधर यांच्या १९८३ च्या चित्रपट 'वेल्लई मानसू' मधून केली. तिचा पहिला मल्याळम चित्रपट नेरम पुलारुम्बोल (१९८६) होता आणि तिचा पहिला तेलगू चित्रपट भाले मिथ्रुल्लू (१९८६) होता. रम्याने, 'कृष्णा रुक्मिणी' या चित्रपटातून कन्नड चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. तिनं 'परंपरा' (१९९३) मधून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं, त्यामुळे अभिनेत्री रातोरात स्टार बनली. चार दशकांहून अधिक काळातील अभिनय कारकीर्दीत, रम्या कृष्णनने पाच भाषांमधील २०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. उत्कृष्ट अभिनय कारकिर्दीसाठी, रम्याला चार फिल्मफेअर पुरस्कार, तीन नंदी पुरस्कार, एक तामिळनाडू राज्य चित्रपट पुरस्कार, एक बिहाइंडवुड्स गोल्ड मेडल आणि इतर अनेक पुरस्कारांसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलंय. चार दशकांहून अधिक काळातील अभिनय कारकीर्दीत, रम्या कृष्णनं पाच भाषांमधील २०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे.रम्या कृष्णन तिच्या वैयक्तिक आयुष्यासाठी देखील चर्चेत राहिली आहे. दाक्षिणात्य दिग्दर्शक के. एस. रविकुमार यांच्यासोबतच्या तिच्या विवाहबाह्य संबंधानं चित्रपटसृष्टीत खळबळ उडवून दिली. १९९९ मध्ये रम्याने के.एस. रविकुमार यांच्यासोबत काम केलं आणि 'पदयप्पा' या चित्रपटात एकत्र काम केलं. त्यांच्या मैत्रीचं लवकरच प्रेमात रुपांतर झालं. रम्या कृष्णन आणि केएस रविकुमार यांचे विवाहबाह्य संबंध होते. रम्या अविवाहित असली तरी केएस रविकुमार आधीच विवाहित होते.त्याहूनही महत्वाचं म्हणजे, रम्याला केएस रविकुमार यांच्या लग्नाची माहिती होती. न्यूज१८ च्या रिपोर्टनुसार, रम्या आणि केएस रविकुमार शारीरिक संबंधात होते आणि अभिनेत्री लग्नाआधीच प्रेग्नन्ट राहिली होती. रिपोर्टनुसार, रम्या कृष्णन प्रेग्नन्ट असल्याचं समजल्यानंतर, केएस रविकुमार यांनी अभिनेत्रीसोबतचे त्यांचे विवाहबाह्य संबंध संपवण्याचा निर्णय घेतला. अभिनेत्री आणि दिग्दर्शक दोघेही मुल जन्माला घालण्यास तयार नव्हते आणि रम्याने गर्भपातासाठी पैशांची मागणी केली. केएस रविकुमार यांनी राम्याला मोठी रक्कम दिली आणि त्यानंतर ते वेगळे झाले.केएस रविकुमार यांच्यासोबत ब्रेकअप झाल्यानंतर रम्या कृष्णन यांना आणखी एक प्रसिद्ध दाक्षिणात्य दिग्दर्शक कृष्णा वामसी यांच्या प्रेमात पडली. काही काळ डेटिंग केल्यानंतर, या जोडप्यानं १२ जून २००३ रोजी लग्न केलं.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कारागृहातील बंद्यांची क्षयरोग तपासणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

कारागृहातील बंद्यामध्ये क्षयरोगाविषयी जागृती निर्माण होण्यासाठी जिल्हा क्षयरोग कार्यालय, बुलढाणा व जिल्हा कारागृह, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने येथील जिल्हा कारागृहामध्ये राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम व क्षयरोग तपासणी शिबीर घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा कारागृह अधिक्षक मेघा शंकर बाहेकर या होत्या. जिल्हा क्षयरोग अधिकारी वर्षा गुट्टे, यांनी बंद्यांना क्षयरोगाबाबत जागृतीपर मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या टीमने बंद्यांची आधुनिक एक्स-रे मशिनव्दारे कारागृहातील एकुण ३३७ बंद्यांची क्षयरोग तपासणी करण्यात आली. तसेच क्षयरोग संशयित बंद्यांचे थुंकीचे नमुने घेण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उमेश नाईक, तुरुंगाधिकारी, मिश्रक गोपाल



खोंडे, चंद्रकांत महाले, कारागृह शिपाई व जिल्हा क्षयरोग कार्यालयाची टीम डॉ. खिरोडकर, सिध्देश्वर सोळंकी, क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सुभाष राजपूत, अनिल भोके तसेच सर्व कारागृह अधिकारी कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# महिला बंदीवानांसाठी रोजगाराची नवी संधी...

## कारागृहात पापड, लोणचे व मसाला पावडर निर्मिती प्रशिक्षणाचा शुभारंभ

**जनसंचलन/ बुलढाणा**

कारागृहातून मुक्त झाल्यानंतर महिला बंदीवानांचे पुनर्वसन व स्वावलंबन साधावे, या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहात महिलांसाठी पापड, लोणचे व मसाला पावडर निर्मितीचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या संकल्पनेतून व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणा यांच्या सहाय्याने केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या पुरस्कृत जन शिक्षण संस्थान, बुलढाणा यांच्या वतीने हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. दि. १९ जानेवारी २०२६ पासून सुरू झालेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत महिला बंदीवानांना पापड बनविणे, विविध प्रकारचे लोणचे तसेच मसाला पावडर तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान कच्चा माल निवड, स्वच्छता, प्रक्रिया पद्धती, साठवणूक तसेच विक्रीसाठी आवश्यक मूलभूत माहिती देण्यात येणार आहे. महिला बंदीवानांना रोजगाराभिमुख कौशल्ये देऊन त्यांना आत्मनिर्भर बनविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, भविष्यात समाजात पुनर्वसन झाल्यानंतर स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या उपक्रमात बुलढाणा जिल्हा कारागृहातील १३ महिला बंदीवान सहभागी झाल्या आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त गणेश बिटोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विकास मार्गदर्शन अधिकारी संजीवनी नाईवाडे, जन शिक्षण संस्थान बुलढाणाचे अध्यक्ष भालचंद्र बापू देशमुख, प्रकल्प अधिकारी अरुण देशमुख, संचालक भागवत पेदे, प्रशिक्षिका मनिषा अरुण देशमुख यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास नायब तहसीलदार हिवाळे, पोलीस उपअधीक्षक बी. डी. पावरा यांच्यासह कारागृह अधीक्षक मेघा कदम-बाहेकर, तुरुंगाधिकारी उमेश नाईक तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अपर्णा आघाव, धनश्री डोंगरदिवे, श्रद्धा जाधव, संजय मदारकर, सोनाली पवार व अश्विनी भालके यांनी सहकार्य केले.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत माजी सैनिकांना मोफत न्यायालयीन मार्गदर्शन

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व त्यांचे अवलंबित यांना मोफत न्यायालयीन माहिती देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांच्या वतीने विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे कोर्ट प्रकरणांबाबत मोफत कायदेशीर मार्गदर्शन देण्यात येत असून यासाठी ॲड. राहुल दाभाडे व ॲड. संजय इंगळे हे दर मंगळवार व गुरुवार कार्यालयीन वेळेत उपस्थित राहतात. माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व अवलंबितांना कोर्ट केससंदर्भात कोणत्याही प्रकारच्या अडचणी, शंका किंवा मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित ॲडव्होकेट यांच्याकडून मोफत सल्ला घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, बुलढाणा यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा...



**जनसंचलन/बुलढाणा**

देशभरात २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात येतो. परंतु या दिवशी रविवारी सार्वजनिक सुट्टी असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयात हा राष्ट्रीय मतदार दिवस शुक्रवारी (दि.२३) साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाची प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, राजेंद्र पोळ, अनिल गोडगे, डॉ. जयश्री ठाकरे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील ५ लाख विद्यार्थी करणार देशभक्तीपर गीतांवर कवायत संचलन. प्रजासत्ताक दिनानिमित्त उपक्रम, २४६७ शाळांचा सहभाग

**जनसंचलन/बुलडाणा**



शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना, शिस्त, आरोग्य जागृती आणि देशभक्तीचा संस्कार रुजवण्यासाठी शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने २६ जानेवारी २०२६ या प्रजासत्ताक दिनी आहे त्यानुसार शुभमुहूर्तावर देशभक्ती गीतांवर आधारित कवायतीचे संचलन करण्याचा उपक्रम राबवण्याबाबतचे निर्देश राज्यातील सर्व शाळांना दिले असून बुलढाणा जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या २४६७ शाळांमधील पाच लाख विद्यार्थी प्रजासत्ताक दिनी कवायत आणि संचलन करणार आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये देशभक्तीपर गीतावर आधारित सामूहिक कवायत संचलन होणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे. यापूर्वी १५ ऑगस्ट २०२५ मध्ये राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शासकीय, खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अशाच प्रकारचे कवायत संचलन केले होते. त्याच धर्तीवर प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम पुन्हा राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, व्यायामाची आवड आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्र प्रथम ही भावना रुजावी आणि त्यांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित व्हावी या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक शाळेत ही कवायत होणार असून तालुक्याच्या ठिकाणी एक तालुकास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांना संबंधित गावातील व शाळेतील सर्व शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक समिती विद्यार्थी सुरक्षा समिती शालेय भौतिक सुविधा विकसन समिती व गावातील सर्व शिक्षण प्रेमी नागरिकांनी, लोकप्रतिनिधींनी उपस्थिती देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन बुलढाणा जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आलेले आहे.

तालुकास्तरीय कार्यक्रमाच्या निमित्ताने तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय मैदानावर सजावट करण्यात येणार आहे. जिल्ह्याचा कार्यक्रम पोलीस कवायत मैदान बुलढाणा येथे आयोजित करण्यात आलेला असून या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम वाढीस लागावे, राष्ट्र प्रथम ही भावना निर्माण व्हावी, शालेय शिस्त, आरोग्य, राष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीस लागावी म्हणून हा कार्यक्रम अत्यंत न भूतो न भविष्यती अशा प्रकारे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाला सर्व विद्यार्थ्यांनी पालकांनी ग्रामस्थांनी शिक्षण प्रेमी नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनी उपस्थिती दर्शवावी. असे आवाहन बुलढाणा जिल्हा प्रशासनामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केलेले आहे.

# स्वच्छ शहर फक्त कागदावर! नाल्याच्या कचऱ्याने जळगाव जामोदची कोंडी

**जनसंचलन/ जळगाव जामोद**




शहराच्या मध्यवर्ती भागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व पंचायत समिती परिसरालगतचा मुख्य नाला गेल्या अनेक महिन्यांपासून कचऱ्याने पूर्णतः तुंबलेला असून, या घाणेरड्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट ओढावले आहे. नाल्यात साचलेल्या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा अक्षरशः कहर सुरू आहे. मात्र नगर परिषद प्रशासन कुंभकर्णाच्या निद्रेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी आता थेट आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. सामाजिक कार्यकर्ते हिंमत चव्हाण यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद जळगाव जामोद यांना २२ जानेवारी २०२६ रोजी लेखी निवेदन देत तातडीने नाल्याची साफसफाई करण्याची मागणी केली आहे. निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षभरापासून या नाल्याची एकदाही योग्य स्वच्छता झालेली नाही. परिणामी पाण्याचा निचरा ठप्प झाला असून आजारांचे माहेरघर तयार झाले आहे. नाल्याची तात्काळ स्वच्छता करावी, साचलेला कचरा उचलावा व भविष्यात अशी अवस्था होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण छेडण्याचा थेट इशाराही देण्यात आला आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# मेहकरवासीयांसाठी पर्वणी! इंदोरीकर महाराजांचे जाहीर हरिकीर्तन रविवारी

**जनसंचलन/मेहकर**



जीवनात एकदा निर्णय घेतला की मागे फिरू नका, कारण मागे फिरणारे इतिहास रचू शकत नाहीत,फक्त या प्रेरणादायी विचारांच्या साक्षीने मेहकर शहरात भव्य धार्मिक-सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेनाप्रमुख वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाराष्ट्र भूषण, संतदासानुदास ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या जाहीर हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, २५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वाजता नगर परिषद मैदान, मेहकर येथे संपन्न होणार आहे. समाजप्रबोधन, अध्यात्म आणि राष्ट्रभक्तीचा त्रिवेणी संगम असलेले इंदोरीकर महाराजांचे हरिकीर्तन ऐकण्यासाठी नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना, युवसेना, महिला आघाडी व सर्व अंगीकृत संघटना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष, मेहकर यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी लोकप्रिय नगराध्यक्ष किशोर भास्करराव गारोळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. या भव्य हरिकीर्तन सोहळ्यासाठी मेहकर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# गणित चुकल्याचा गुन्हा महागात!

## चौथीतील चिमुकल्यावर शिक्षकाची अमानुष मारहाण; रुग्णालयात उपचार सुरू, तरीही कारवाई शून्य

**जनसंचलन/ खामगाव**



राज्य शासनाने शाळांमधील विद्यार्थी सुरक्षेसाठी नियम, मार्गदर्शक सूचना आणि जबाबदाऱ्या ठरवून दिल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्या कागदावरच असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. खामगाव तालुक्यातील पिंपळगाव राजा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गणित चुकल्याच्या रागातून शिक्षकाने अवघ्या साडेनऊ वर्षांच्या चौथीतील विद्यार्थ्याला अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पवन इंगळे (वय ९) असे या चिमुकल्याचे नाव असून वर्गशिक्षक रवींद्र चीम यांनी ही मारहाण केल्याचा आरोप आहे. ही मारहाण इतकी क्रूर होती की पवनला थेट खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करावे लागले असून त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. शाळा म्हणजे ज्ञानाचं मंदिर की मुलांवर अत्याचार होण्याचं केंद्र, असा संतप्त सवाल या घटनेमुळे उपस्थित होत आहे. १३ डिसेंबर रोजीच राज्य शासनाने विद्यार्थी सुरक्षेबाबत कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. मात्र त्या सूचनांची पायमल्ली करत शिक्षकाकडून थेट शारीरिक अत्याचार झाला तरी ना तात्काळ गुन्हा दाखल, ना निलंबन, हे प्रशासनाचं अपयश नाही तर काय?पिंपळगाव राजा पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थ्याला रुग्णालयात पाठवले असून वैद्यकीय अहवालानंतर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया असल्याचे सांगितले जात आहे. मात्र प्रश्न असा आहे की, लहान मुलाला मारहाण होईपर्यंत वाट पाहायची का? या घटनेमुळे पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून संबंधित शिक्षकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. आता पोलीस आणि शिक्षण विभाग खरोखर कारवाई करतात की पुन्हा एकदा ङ्गचौकशीफ्च्या नावाखाली प्रकरण दाबले जाते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे.

# पाटोदा येथे एसटी बसचा कहर!

## बाहेर निघालेल्या पत्र्यामुळे मोटरसायकलस्वार गंभीर जखमी

**जनसंचलन/पाटोदा**



राज्य परिवहन महामंडळाच्या निष्काळजीपणाचा आणखी एक बळी पाटोदा येथे समोर आला आहे. आज सकाळी पाटोदा गावात एसटी बस आणि मोटरसायकल यांच्यात झालेल्या भीषण अपघातात एक जण जबर जखमी झाला असून, एसटी बसच्या अनफिट अवस्थेमुळेच हा अपघात घडल्याचा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे. चिखली आगाराची पेन सावंगीचिखली ही नियमित धावणारी एसटी बस सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास गावातील अरुंद व वळणदार रस्त्यावरून वेगात जात होती. याचवेळी समोरून जाणाऱ्या मोटरसायकलला बसच्या बाजूला बाहेर निघालेल्या सुमारे १२ इंच लोखंडी पत्र्याचा जोरदार धक्का बसला. या धडकेत मागे बसलेले भास्कर विष्णू खंदारे (वय ६५) हे गंभीर जखमी झाले, तर चालक भिकाजी काकफळे (वय ३५) यांना किरकोळ दुखापत झाली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बस फोर स्पीडमध्ये होती आणि चालकाने कोणतीही खबरदारी घेतलेली नव्हती. गावाचा रस्ता अरुंद असतानाही बेफिकीरपणे बस चालवली जात होती. अपघातानंतर एसटी बस पूर्णतः अनफिट असल्याचे स्पष्ट दिसून आले. अशा धोकादायक अवस्थेतील बसेस रस्त्यावर धावत असल्याने नागरिकांचे जीव धोक्यात येत आहेत. या गंभीर घटनेची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८